# शालेय आंतरवासिता अहवाल व शालेय अनुभव कार्यक्रम

## टप्पा - 2

Page No. Date.

# प्रेरणास्थान -

## प्र.प्राचार्य

## निर्मळे आर. एल.

## मॅडम

Page No.: Date :

# मार्गदर्शिका –

प्राध्यापिका
शिरतोडे व्ही. एल.
मॅडम

Lucky Page No.
Date : / /

# अनुक्रमणिका

| क्र. | घटकाचे नाव | सही |
| --- | --- | --- |
| | आंतरवासिता स्वागत समारंभ | |
| | प्रस्तावना | |
| | महत्व | |
| | वैशिष्ट्ये | |
| | छात्राध्यापकांची वर्गनिहाय यादी | |
| | परिपाठ | |
| | दिनदर्शिका, वेळापत्रक | |
| | शेरे पुस्तक | |
| | सहशालेय उपक्रम नियोजन आयोजन | |
| | सहाध्यायी निरीक्षण नोंद | |
| | घटक चाचणी | |
| | कृती अभ्यास | |
| | समारोप. | |

।। नहि ज्ञानेन सदृश्य पवित्रमिह विद्यते ।।

श्री.बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ अंबप,संचलित
कॉलेज ऑफ एज्युकेशन(बी.एड) पेठ वडगांव.

जे.के. माळवे, प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा पेठ वडगाव.

# स्वागत समारंभ

## सन 2022 - 23

## कार्यक्रमपत्रिका

## प्रमुख पाहूणे

श्री.जे.बी.पाटील सर

## प्रमुख उपस्थिती

श्री. सी.जी.पाटील सर

## इतर उपस्थिती

छात्राध्यापक,
छात्राध्यापिका,विद्यार्थी,विद्यार्थिनी
व कर्मचारी.

# कार्यक्रमपत्रिका

## [illegible].के. माळवे प्राथमिक माध्यमिक
## आश्रमशाळा पेठ वडगाव
## [illegible]ॉलेज ऑफ एज्युकेशन
## बी.एड. पेठ वडगाव.

# स्वागत समारंभ

सन २०२२ - २०२३

**प्रमुख पाहुणे :** श्री जे.बी.पाटील सर (मुख्याध्यापक)

**प्रमुख उपस्थिती :** श्री. सी.जी पाटील सर
प्रा. सौ. शिरतोडे व्ही. एल मॅडम

**इतर उपस्थिती :** छात्राध्यापक, छात्रध्यापिका, विद्यार्थी
विद्यार्थीनी व इतर कर्मचारी

दि: १९|१२|२०२२

| | | |
|---|---|---|
| प्रतिभापूजन | प्रास्ताविक | पाहुण्यांचे मनोगत |
| उपस्थित मान्यवरांचे मनोगत | छात्राध्यापक मनोगत | आभार... |

# आंतरवासिता स्वागत समारंभ

**प्रमुख पाहुणे :** श्री. जे.बी. पाटील सर (मुख्याध्यापक)

**प्रमुख उपस्थिती :** प्रा. सौ शिरतोडे व्ही.एन मॅडम
श्री. सी.जी. पाटील सर

**अध्यक्ष :** पाटील सी.ए. मॅडम

**सुत्रसंचालन :** छात्राध्यापिका वृषाली मुंडे मॅडम

**प्रास्ताविक :** छात्राध्यापिका शुभांगी पाटील मॅडम

**मनोगत :** छात्राध्यापिका सुजाता कुंभार मॅडम
छात्राध्यापक प्रतिक चौगुले सर.

**आभार :** छात्राध्यापिका तबसुम नदाफ मॅडम

**कार्यक्रमाची दिनांक व वेळ :** 19/12/2022
सकाळी 11.00 वाजता

जे.के. माळवे प्राथमिक माध्यमिक
आश्रमशाळा, पेठ वडगाव.

Page No: Date:

# स्वागत समारंभ अहवाल

दि १७ डिसेंबर २०२२ रोजी जे.के. माळवे प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा पेठ वडगाव येथे कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड) पेठ वडगाव आंतरवासिता गट क्र. १ या मधील छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचा स्वागत समारंभ साजरा करण्यात आला.

जे.के. माळवे आश्रमशाळा या विद्यालयात स्वागत समारंभ साजरा करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक जे.बी. पाटील सर यांच्या हस्ते मुंडे व्ही.टी यांचे स्वागत केले. तसेच इतर छात्राध्यापक व छात्राध्यापिका यांचे स्वागत केले. प्रमुख उपस्थिती अशोकराव माने बी.एड. कॉलेज ऑफ एज्युकेशन, पेठ वडगाव च्या प्रा. शिरतोडे व्ही.एल मॅडम होत्या. तसेच सी.जी पाटील सर (जे.के. माळवे प्रा.मा. आश्रमशाळा) येथील सर होते. शाळेचे मुख्याध्यापक जे.बी. पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना छात्राध्यापक व छात्राध्यापिकांची ओळख करून दिली.

मार्गदर्शिका शिरतोडे मॅडम यांनी मार्गदर्शन केले अशा प्रकारे स्वागत समारंभ पार पडला.

आंतरवासिता डिजीटल








आश्रमशाळेतील शिक्षकांचे स्वागत करताना...

मार्गदर्शिका शिरतोडे मॅडम यांचे स्वागत करताना



संपर्क शिक्षिका पाटील मॅडम यांचे स्वागत करताना



छात्रमुख्याध्यापिकांचे छात्रउपमुख्याध्यापिका स्वागत करताना



छात्रमुख्याध्यापिका स्वागत समारंभावेळी मनोगत व्यक्त करताना



आंतरवासिता पुर्वनियोजन करताना



आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांना ओंजरवासितेचे निवेदन देताना







नेमप्लेट बनविल्यानंतर

मुख्याध्यापकांशी सविनय चर्चा



Page No: Date:

# प्रस्तावना

छत्रपती शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत कॉलेज ऑफ एज्युकेशन पेठ वडगाव येथे अभ्यासक्रमाअंतर्गत शालेय आंतरवासिता टप्पा- २ प्रात्यक्षिक समाविष्ट करण्यात आले आहे. सन २०२२ - २०२३ या शैक्षणिक वर्षात शालेय आंतरवासिता जे.के.माळवे प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा पेठ वडगांव येथे आयोजित करण्यात आले आहे.

हे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी कॉलेजच्या प्राचार्या निर्मळे आर.एल मॅडम, मार्गदर्शिका प्रा. शिरतोडे व्ही.एल. तसेच प्रा. सावंत ए.पी. प्रा. सोरटे एस.के. यांचे मार्गदर्शन मिळाले.

Page No. Date.

# प्रास्ताविक

प्रत्येक व्यवसायाला संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञता असावी लागते. तज्ज्ञता प्राप्त करणेसाठी उमेदवाराला पूर्वतयारी करणे आवश्यक असते. शिक्षक हा सुद्धा एक व्यवसाय आहे. इतर व्यवसायाप्रमाणे शिक्षक निर्मितीलाही पूर्वतयारी करणे व विविध अनुभव देणे जरुरीचे आहे. सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये आंतरवासिता रूढ आहे. विद्यार्थी शिक्षकांना शिक्षकांच्या प्रत्यक्ष व किंवा वास्तव अनुभव मिळावा म्हणून एन, सी. टी. ई. आराखडा 2014 नुसार द्विवर्षीय बी. एड अभ्यासक्रमामध्ये शालेय आंतरवासितेचा समावेश करण्यात आलेला आहे. प्राचार्य, मुख्याध्यापक, मार्गदर्शक प्राध्यापक, शालेय शिक्षक, सहकारी विद्यार्थी, शिक्षक यांचा समृद्ध अनुभव, सहकार्य व मार्गदर्शन याद्वारे सक्षम शिक्षक तयार होतील याची खात्री वाटते.

# गरज आणि महत्त्व

प्रत्येक व्यवसायाला संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञता असावी लागते शिक्षक हा सुद्धा एक व्यवसाय आहे. इतर व्यवसायाप्रमाणे शिक्षक निर्मितीलाही पूर्वतयारी करणे व विविध अनुभव देणे जरूरीचे आहे. विद्यार्थी शिक्षकांना शिक्षकांचा प्रत्यक्ष किंवा वास्तव अनुभव मिळावा म्हणून आंतरवासितेचा समावेश करण्यात आला आहे.

प्राथमिक शिक्षण हा शिक्षणाचा मूलभूत पाया आहे. म्हणूनच प्राथमिक शिक्षकाकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरते. तसेच माध्यमिक शिक्षकाकडे लक्ष देणे महत्त्वाचे ठरते. या व्यावसायिक प्रशिक्षणात तात्वीक भागाबरोबरच जेव्हा प्रात्यक्षिक कार्य दिले जाते. तेव्हा त्या ठिकाणी विद्यार्थी शिक्षकाची क्षमता, कामगिरी, बांधिलकी या तीन क्षेत्रांशी शिक्षकाची बांधिलकी महत्त्वाची असते.

आंतरवासिता उपक्रमामुळे बालक, पालक, शिक्षक, समाज व राष्ट्र या सर्वांची आव्हाने पेलणारा सक्षम अध्यापक निर्माण होऊ शकेल. परिपूर्ण व अनुभवयुक्त सक्षम शिक्षक सुरुवातीपासून मिळाल्यास अध्यापन दर्जेदार होण्यास मदत होईल. शालेय आंतरवासिता हा बी.एड अभ्यासक्रमाचा आत्मा आहे. शालेय आंतरवासितेद्वारे विद्यार्थी शिक्षक हे शिक्षकी अवसायाशी समरस होऊन शाळा आणि समाज यांच्या विकासाशी बांधिलकी व क्षमता राखणारा राहील अशी आशा वाटते.

अनुभव घेतल्याशिवाय शिक्षकांची व्यवसाय चांगला [illegible] शकत नाही. त्यामुळे विद्यार्थी शिक्षकाने आंतरवासिता मह [illegible] अनुभवक गरजेचे ठरते. म्हणूनच म्हटले आहे Practice

Page No: Date:

make man perfect.

अनुभव हाच खरा शिक्षक आहे.

या आंतरवासितामधून विद्यार्थी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या वर्तनाचा अभ्यास करता येतो. म्हणून आंतरवासिता संबंधी अभ्यास करणे गरजेचे आहे.

Page No. Date

# आंतरवासितेचे स्वरूप

सर्वसाधारणपणे आंतरवासितेच्या स्वरूपात खालील बाबींचा समावेश होतो.

1. शालेय समस्यांची माहिती देणे.
2. पालक-शिक्षक यांची माहिती घेणे.
3. शाळेतील विविध कार्यक्रमात सहभागी होणे.
4. विविध उपक्रम / नवोपक्रम राबविणे.
5. विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे नियोजन करणे.
6. विद्यार्थ्यांचा व्यक्तिगत अभ्यास करणे.
7. क्रिडा स्पर्धेचे आयोजन करणे.
8. दैनंदिन अहवाल लिहिणे.
9. विविध स्पर्धांचे आयोजन करणे.

colors

Page No: Date:

(10) विविध क्षेत्रभेटी यांचे आयोजन करणे.

(11) शालेय दजर कार्यवाहित नोंदी करणे.

(12) ~~कार्यालयीन~~ शाळेतील कार्यालयीन कामांची स्वरूपे लक्षात घेणे.

colors

# उद्दिष्टे

(१) विद्यार्थी शिक्षकांना प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर अध्यापनाची कृतीशीलता समजून घेण्यास सक्षम बनविणे.

(२) विद्यार्थी शिक्षकांना शाळेची तात्वीक पार्श्वभूमी, मातृसंस्थेची ध्येये उद्दिष्टे, संघटन व व्यवस्थापन यांचे आकलन होण्यास सक्षम बनविणे.

(३) विद्यार्थी शिक्षकास नियोजन अध्यापन व मूल्य निर्धारण या सर्व शालेय उपक्रमामध्ये सहभागी होण्यास मदत करणे.

(४) विद्यार्थी शिक्षकांना शालेय शिक्षक, सामाजिक सदस्य व शालेय विद्यार्थी सर्वांविषयी आंतरक्रिया प्रस्थापित करण्यास मदत करणे.

(५) विद्यार्थी शिक्षकांना शालेय शिक्षकांचे जीवन, जबाबदारी, कर्तव्ये व सामाजिक बांधिलकी समजून घेण्यास सक्षम बनविणे

(६) विद्यार्थी शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकासाच्या गरजा लक्षात घेऊन नियमित शिक्षकाची भूमिका समजून घेण्यास मदत करणे.

(७) विद्यार्थी शिक्षकांमध्ये अभ्यासक्रमाचे पैलू व त्याची गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी आणि अध्ययन अध्यापनाचे मूल्यनिर्धारण समजून घेण्याचे कौशल्य विकसित करण्यास मदत करणे.

(८) विद्यार्थी शिक्षकांना शालेय विद्यार्थ्यांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी सज्ज करणे.

(९) विद्यार्थी शिक्षकांना शालेय आंतरवासितेमध्ये शालेय अनुभव कार्यक्रमाचे आयोजन संघटन व चिकित्सक चिंतन करण्यास मदत करणे.

Page No.: Date.:

(10) सद्यस्थितीतील शाळामध्ये असणाऱ्या मर्यादाबाबत बदल घडवून आणण्याची क्षमता प्राप्त करण्यास मदत करणे.

(11) विविध कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धा यांची काळजीपूर्वक निवड व संघटन करून त्याचे आयोजन करण्यास सक्षम बनविणे.

(12) प्रत्येक विद्यार्थी शिक्षकाने शालेय अनुभव कार्यक्रमाचे चिकित्सक चिंतन करणे व त्याच्या नोंदी ठेवणे यासाठी मदत करणे.

colors

Page No. Date

# आंतरवासिना वैशिष्ट्ये

1. भावी व्यवसायात प्रवेशापूर्वी प्रत्यक्ष अनुभव देणारा नियोजन पूर्वक कार्यक्रम म्हणजेच आंतरवासिना होय.
2. अनुभवी शिक्षकांचे प्रत्यक्ष मार्गदर्शन होय.
3. शाळा व महाविद्यालय यांच्यातील अंतर भरून काढणारा उपक्रम होय.
4. शिक्षणाविषयी व्यापक दृष्टीकोन निर्माण करणारा प्रभावी कार्यक्रम
5. व्यावसायिक मूल्य रुजविणारा समृद्ध कार्यक्रम.

# आंतरवासिता फायदे

## • शैक्षणिक फायदे :-

① प्रत्यक्ष शालेय कामकाजाचा अनुभव मिळतो.

② शाळेचे वेळापत्रक तयार करण्याचे कौशल्य विकसित होते.

③ प्रश्नपत्रिका संविधान तक्ता यांचा संबंध समजतो.

④ शैक्षणिक व्यावसायिक कामाचा अनुभव प्राप्त होतो.

⑤ शाळेच्या संबंधी समस्यांची माहिती होता येते.

## • सहशालेय अभ्यासपूरक कार्यक्रमाचे फायदे :

### वर्गस्पर्धा

निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, कविता वाचन, गायन, घोषवाक्य इ. स्पर्धा घेण्याचे कौशल्य विकसित होते.

Page No. Date :

## • मैदानी स्पर्धा :

① विविध खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करणे व पार पडणे.

② विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्याच्या कौशल्यात वृद्धी होते.

③ ऑफ पिरीयडच्या सदुपयोग कौशल्य निर्माण होते.

④ दिनविशेष, परिपाठ साजरे करणे.

## कार्यालयीन दप्तर पाहणीतून होणारे फायदे :

① शालेय दप्तराची माहिती मिळते.

② शालेय दप्तरातील जनरल रजिस्टर, उपस्थिती, प्रगती पुस्तक संकलित नोंदपत्रक सेवा पुस्तक प्रत्यक्ष पाहायला मिळतात.

③ दप्तराचे कायदेशीर महत्त्व समजते.

④ नस्तमीकरण फाइलिंग ची पध्दत समजते.

Page No. Date.

## सांस्कृतिक कार्यक्रम आयोजनाचे फायदे :-

① सांस्कृतिक कार्यक्रमातंर्गत विविध गुणदर्शन व आयोजन व नियोजन व प्रत्यक्ष कार्यवाही करण्याचे अनुभव.

② विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गीत, नृत्य, वाद्य, अभिनय इ. परिश्रम करता येतो.

③ विविध सुप्त गुण प्रकटीकरणासाठी मार्गदर्शन.

④ विविध पारितोषिक वितरणाचे कौशल्य प्राप्त होते.

⑤ कार्यक्रमात सुयोग्य अतिथींची निवड करता येते.

## इतर महत्त्वाचे फायदे :-

① उमेदवारी कार्यामुळे विद्यार्थी शिक्षक, उपमुख्याध्यापक, मुख्याध्यापक इ. समवेत आंतरक्रिया घडतात.

② विद्यार्थ्यांच्या समस्याची जाणीव झाल्याने उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न केला जातो.

③ गटाने कार्य होत असल्याने स्वतःची जबाबदारी व कर्तव्ये समजतात.

④ सुत्रबद्ध पद्धतीने थोडक्यात आभार प्रदर्शन करता येते.

# छात्राध्यापक आंतरवासिता फायदे

1. वेळापत्रकाचे नियोजन कशा पद्धतीने बनवावे याचे ज्ञान प्राप्त होते.
2. तासिका कशा घ्यावयाचे याचे मार्गदर्शन मिळते.
3. शालेय नियोजन कसे करावे याचे मार्गदर्शन मिळते.
4. परिपाठ कसा घ्यावयाचा याचे ज्ञान प्राप्त होते.
5. अध्ययन, अध्यापन कौशल्य, दैनंदिन रचण कौशल्य विकसित होण्यास मदत होते.
6. अध्ययन कर्ता व अध्यापक यांच्यातील सहसंबंध दृढ होतात.
7. शालेय कामकाज कशा पध्दतीने चालते याचा अनुभव मिळतो.
8. प्रश्नपत्रिका, संविधान तक्ता इ. कशा पद्धतीने बनवावे याचे ज्ञान मिळते.

(9) अध्यापन करताना समस्या जाणवतात त्या समस्येवर उपाय काढण्याचे कौशल्य विकसित होते.

(10) स्वविकास वृद्धी मध्ये वाढ होते.

(11) अध्ययनकर्त्याच्या समस्येचे निराकरण कसे करावे हे समजते.

(12) प्रत्यक्ष शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचा अनुभव मिळतो.

(13) अभ्यासेतर उपक्रम, स्पर्धा, कार्यक्रम, क्षेत्रभेटी इ. आयोजन कसे करावे याचा अनुभव मिळतो.

(14) विद्यार्थी शिक्षकाला नियमित शिक्षकाची भूमिका समजण्यास होते.

(15) प्रसंगावधान साधण्याचे कौशल्य विकसित होण्यास मदत होते.

(16) टिमवर्कची आणि परस्पर सहकार्याची तसेच इतरांना प्रोत्साहन देण्याची सवय लागते.

(17) ज्ञानाचा मुक्त उपयोग करता येतो.

(18) विद्यार्थी शिक्षकाला जबाबदारी, कर्तव्ये, बांधिलकी इत्यादी समजून घेण्यास मदत होते.

# शालेय परिसर



Page No. : Date :

# शालेय परिपाठ

राष्ट्रगीत

प्रार्थना

प्रतिज्ञा

सुविचार

दिन विशेष

सामान्यज्ञान

बातम्या

विद्यार्थ्यांचे वाढदिवस

सुचना

संविधान

colors

Page No. Date


# राष्ट्रगीत

जणगणमन - अधिनायक जय हे
भारत - भाग्यविधाता
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे
गाहे तव जय गाथा,
जणगण मंगल दायक जय हे
भारत - भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे
जय जय जय, जय हे ॥

colors

प्रार्थना






# प्रार्थना

हेच आमुची प्रार्थना अन् हेच आमुचे मागणे
माणसाने माणसाशी माणसासम वागणे

धर्म जाती प्रांत भाषा द्वेष सारे संपू दे
एक निष्ठा एक आशा एक ऐकी राहू दे
अन् पुन्हा पसरो मनावर शुद्धतेचे चांदणे

भोवताली दाटला अंधार दुःखाचा जरी
सूर्य सत्याचा उद्या उगवेल आहे खात्री
तोवरी देई आम्हाला काजव्याचे जागणे

लाभले आयुष्य जितके ते जगावे चांगले
चालणे याला पुढे जे थांबले ते संपले



प्रतिज्ञा

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत. माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यातच माझे सौख्य सामावले आहे.

शाळेची बेल, मुलींचे वसतिगृह, शिक्षकस्टाफरूम





शाळेचे सभागृह

# शालेय परिसर

निसर्गरम्य वातावरणामध्ये शाळेची इमारत इमारती असून साधारणतः ४ एकर जागेमध्ये शाळेचा परिसर विस्तारलेला आहे. शाळेच्या इमारती समोरच शाळेचे मोठे मैदान आहे. शाळेच्या चारही बाजू कंपाऊंडने पॅक आहेत. पूर्व दिशेला शाळेचे मुख्यद्वार आहे. सुंदर अशी सुशोभित झाडांनी शाळेचा परिसर नटलेला आहे.

शाळेची इमारत इंग्रजीतील एल (L) आकाराची आहे. शाळेच्या परिसरात पाण्याच्या दोन टाक्या आहेत. मेस विभाग प्रशस्त आहे. मैदानावर विविध प्रकारचे खेळ घेतले जातात. धावणे, कबड्डी, खो-खो, लंगडी, फूटबॉल हे खेळ खेळले जातात. शाळेत पाकिंगची व्यवस्था आहे.

शालेय इमारत



# शालेय इमारत

महाराष्ट्र भरकी जमात जनता सेवक संघ पेठवडगाव संचलित प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा पेठ वडगाव या शाळेची इमारत २ मजली आहे. या शाळेचा परिसर ४ एकर जागेत आहे. या शाळेची इमारत प्रशस्त, आकर्षक, स्वच्छ, सुंदर व हवेशीर अशी आहे. इमारतीचे बांधकाम भक्कम असे आहे. वर्गामध्ये हवा व उजेड खेळती राहण्यासाठी वर्गामध्ये खिडक्या आहेत. विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाची व्यवस्था केली आहे. शाळेला समोरील बाजूस पूर्वेला मुख्यप्रवेशद्वार. उरलेल्या तिन्ही बाजूंना भिंती आहेत. शाळेच्या भिंतीवर नोटीसबोर्ड व भित्तीफलक लावलेले आहेत.

## इमारतीचा आकार :-

इमारतीची रचना इंग्रजी लिपीतील L आकारात बांधली आहे. शाळेची इमारत ही दोन मजली आहे. इयत्ता १ली ते १०वी साठी स्वतंत्र खोल्या आहेत.

संस्थापक कार्यालय





मुख्याध्यापक कार्यालय

# शाळेची स्थापना

"दलित मित्र पुरस्काराने संचलित"

• महाराष्ट्र भटकी जमात जनता सेवक संघ, पेठ वडगाव संचलित प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा पेठ वडगाव ता. हातकणंगले जि. कोल्हापूर.

कोल्हापूर जिल्ह्यातील ही पहिली आश्रमशाळा आहे. महाराष्ट्र शासनाने १९६२ साली आश्रमशाळेला मान्यता दिली. या शाळेची स्थापना १९६१ साली करण्यात आली. १९९३ साली प्राथमिक माध्यमिक शिक्षण संस्थेत सुरु करण्यात आले. १९९५ साली महाराष्ट्र शासनाने या संस्थेला अनुदान दिले. दर महिना प्रत्येक विद्यार्थ्याला १५०० रु. शासन देते.

ही शाळा सर्व सोयीनीयुक्त आहे. या शाळेत प्राथमिक व माध्यमिक चे एकूण १३० विद्यार्थी व प्राथमिकचे १२० अशा प्रकारे २५० विद्यार्थी या संकुलात शिक्षण घेत आहेत.

## उद्देश

प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळा पेठ वडगाव ही शाळा सुरु करण्यामागे एकच उद्देश आहे. आपल्या सुजलाम सुफलाम भारत देशातील समाजात शरद्‌ळीतकरु असे बरेच विद्यार्थी आहेत त्यांना शिक्षणाची आवड आहे. पण परिस्थितीमुळे त्यांना शिकता येत नाही. परिस्थितीमुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे.

समाजात गोपाळ, गोसावी, नंदिवाले आहेत म्हणजेच भटक्या विमुक्त समाजातील मुलांना शिकता यावे मोफत शिक्षण मिळावे यासाठी ही आश्रमशाळा सुरु केली आहे. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळावे यांची स्वप्ने पूर्ण व्हावीत यासाठी ही आश्रमशाळा सुरु करण्यात आली.



मुलांचे व मुलींचे वसतीगृह, पाण्याची आ...



मुलींचे वसतीगृह

# आश्रमशाळेचा दिनक्रम

जे. के. माळवे प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा पेठ वडगाव ही शाळा 11.00 वाजता सुरु होते, पण या शाळेचा दिनक्रम 6.00 वाजल्यापासून सुरु होतो. सकाळी 06.00 वाजता उठून प्रातःविधी आवरणे त्यानंतर 8.00ना नाष्टा, नाष्ट्याला विविध प्रकार असतात 9 ते 10.00 पर्यंत अभ्यासिका असते त्यानंतर जेवण, मैदान स्वच्छता इ. 11.00 पर्यंत होते. यानंतर मुले विद्यार्थी प्रार्थनेसाठी येतात. 11.15 ला तासिका चालू होतात. व 2.00 वाजता जेवणाची वेळ होते. 2.00 ते 2.45 पर्यंत विद्यार्थी जेवतात. त्यानंतर 5.15 पर्यंत तासिका होतात 5.15 ला शाळा सुटते. 5.30 ते 6 या वेळेत मुलांना चहा दिला जातो. 8.00 ते 9.00 या वेळेत रात्रीचे जेवण असते. आठवड्यातून दोन वेळा अंडी मटण असे जेवण असते. अशाप्रकारे 8.00 ला जेवण झाल्यावर 9.00 ते 10.00 अभ्यासिका व सर्वासित्र होते. शालेय पोषण आहार हा दुपारी देतात. अशा रितीने आश्रमशाळेचा दिनक्रम चालू असतो.

फलकलेखन





प्रयोगशाळेचे साहित्य

# फलकलेखन

शाळेच्या इमारतीच्या भिंतीवर वेगवेगळ्या ठिकाणी फलक, बोर्ड व भितीफलक लावलेले आहेत. या फलकावरती विद्यार्थ्यांनी चित्र माहितीवर लेख तसेच त्यांनी बनवलेले क्राफ्ट वर्क प्रदर्शित केले शाळेच्या विविध उपक्रमाविषयी प्रसिद्ध झालेल्या बातम्या ही नोटी चिकटविलेल्या आहेत. त्याचप्रमाणे भितीफलकावर वेगवेगळ्या विष माहिती लिहिली आहे. प्रत्येक वर्गाबाहेर मध्ये प्रशस्त फलक उ


## नोटीस बोर्ड :-

विद्यार्थ्यांना एकत्रितपणे माहिती व सूचना पोहचविण्यासाठी नोटीस बोर्डची व्यवस्था करण्यात आली आहे.

## बहुउद्देशीय खोली :-

बहुउद्देशीय खोलीमध्ये विषयानुसार शैक्षणिक सामग्री शिक्षक व विद्यार्थ्यांना याचा उपयोग होतो.

colors





प्रयोगशाळा



ग्रंथालय

# संगणक कक्ष :-

संगणक कक्ष पूर्ण सोयीनियुक्त उपलब्ध आहे. यामध्ये 10 संगणकाचा समावेश होतो सर्व संगणकांना इंटरनेटची सुविधा देण्यात आली आहे. त्या संगणकांवरच शाळेचे कामकाज पाहिले जाते. संगणकाचा वापर विद्यार्थी शिक्षक दोघेही वापर करतात.

# ग्रंथालय

ग्रंथालय हा शालेय वास्तूचा एक अविभाज्य घटक आहे. शाळेतील ग्रंथालय हे स्वच्छ व सुंदर आहे. भरपूर उजेड व स्वच्छता व अभ्यासानुकूल आहे. ग्रंथ हे शालेय जीवनाशी निगडीत असतात. ग्रंथ हेच गुरु त्यामुळे विद्यार्थी शिक्षक व शाळेच्या दृष्टीकोनातून निगडीत ग्रंथालय हे महत्वाचे आहे. ग्रंथालयामध्ये सर्व वर्गाची पाठ्यपुस्तके व अवांतर वाचनाची पुस्तके उपलब्ध आहेत. ग्रंथालयात पुस्तके कपाटात लावून ठेवण्यात आली आहेत.

# प्रयोगशाळा :-

आश्रमशाळेमध्ये ग्रंथालयाच्या बाजूला छोटी प्रयोगशाळा उपलब्ध आहे. यामध्ये 9वी, 10वी चे विद्यार्थी प्रयोगशाळेचा वापर करतात यामध्ये रसायनशास्त्र, जीवशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र, चित्रकला यांचा समावेश होतो.






Page No. Date

# क्रिडांगण

शाळेच्या इमारतीच्या बाजूस शाळेचे क्रिडांगण आहे. शाळेचे क्रिडांगण मोठे आहे. यामध्ये २००मी रनिंग, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, लांब उडी यांची मैदाने आहेत. कबड्डी संघाची २०१५ साली निवड झालेली आहे. क्रिडांगणांच्या सभोवती शाळेचा संपूर्ण परिसराभोवती कुंपण असून सभोवताली झाडे लावली आहेत.

वर्गखोल्या





ग्रंथालय



# विविध विभाग